**प्रकल्प पुरस्कर्ते मेसर्स रॉयल पॉटरी सिरॅमिक्स, चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मरकागोंडी लॅटेराईट खाण प्रकल्प (क्षेत्र – ३३.०३ हेक्टर, उत्पादन क्षमता-१,२५,००० टन/वर्ष) करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प पुरस्कर्ते मेसर्स रॉयल पॉटरी सिरॅमिक्स, चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मरकागोंडी लॅटेराईट खाण प्रकल्प (क्षेत्र – ३३.०३ हेक्टर, उत्पादन क्षमता-१,२५,००० टन/वर्ष) करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी मरकागोंडी ग्रामपंचायत स्थानावर दिनांक २३ नोव्हेंबर, २०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबईयांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- १०३/२०१६, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/ बी-४४६९, दि. १६-११-२०१६ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) श्री वैभव नावडकर , – **अध्यक्ष**
अप्पर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर
(मा. जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर
यांचे प्रतिनिधी)

२) श्री प्रविण एम. जोशी, – **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर,
(मप्रनि मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) श्री पी. एन. धुमाळ – समन्वयक
प्रभारी-उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, चंद्रपूर

श्री धुमाळ, समन्वयक यांनी समितीचे अध्यक्ष, सरकारी अधिकारी, प्रकल्प अधिकारी व पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीस मोठ्या संख्यने उपस्थित असलेल्या जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व पुढिल १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारी असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आले आहे. उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांना प्रकल्प पुरस्कर्ते मेसर्स रॉयल पॉटरी सिरॅमिक्स, चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मरकागोंडी लॅटेराईट खाण प्रकल्प (क्षेत्र - ३३.०३ हेक्टर, उत्पादन क्षमता-१,२५,००० टन/वर्ष) करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी प्रकल्प पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग ब-१ (B-I) वर्गात मोडत आहे. उपरोक्त प्रकल्पास १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या मूल्यांकन समितीने (SEAC-I) दिनांक ११ व १२ मार्च, २०१४ दरम्यान झालेल्या ८५ व्या बैठकीत प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यात आलेली आहे.

पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक

आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकसत्ता यात मराठीसाठी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ व दैनिक द हितवादा मध्ये इंग्रजीत दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी एक महिना अगोदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रसिध्द केली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची प्रत भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, भोपाळ कार्यालय, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय- चंद्रपूर, जिल्हा परिषद- चंद्रपूर, तहसील कार्यालय- जिवती, जिल्हा- चंद्रपूर, जिल्हा उद्‌योग केंद्र- जिल्हा- चंद्रपूर, ग्रामपंचायत कार्यालय- मरकागोंडी, तालुका-जिवती, जिल्हा- चंद्रपूर , मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, पर्यावरण विभाग- मंत्रालय, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर येथे सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आले होते. समन्वयक यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांस वरिल प्रकल्पाबाबत एक आक्षेप नोंदविण्यात आलेला आहेत. संबंधितांना जाहिर लोकसुनावणीवेळी हजर राहण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत. समन्वयक यांनी असे सांगितले की उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना करण्याची संधि देण्यात आली असून लेखी व तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. त्यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती राज्य व स्थानिक भाषा मराठीत करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचनाअसल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्प अधिका-यांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. तदनंदर मा. अध्यक्ष

महोदयांनी उपस्थितांना काही आक्षेप, हरकती व सूचना असल्यास नमुद करण्याचे आवाहन केले.

श्री खेमचंद्र मेश्राम, राहणार-चंद्रपूर यांनी असे सांगितले की त्यांनी सदरहू प्रकल्पाबाबत लेखी आक्षेप दिनांक ११-११-२०१६ रोजी उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांच्याकडे नोंदविलेला आहे. त्यांनी आक्षेप घेतला की सदरहू प्रकल्प "घोषित वनक्षेत्रात" मोडत असल्याने प्रकल्प प्रवर्तक त्याठिकाणी खाणकाम करु शकत नाही. सदरहू खाणकामामुळे परिसरात हवेच्या प्रदूषणात वाढ होईल अशी भिती त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले की "अती प्रदूषित" संवर्गात चंद्रपूर शहराचा समावेश पुर्वी झालेला होता. प्रकल्पापेक्षा चंद्रपूर रहिवाश्यांचे आरोग्य महत्वाचे आहे.

श्री बंडू लंभाजी राठोड, माजी सरपंच, पल्लझरी गाव यांनी विचार व्यक्त केले की ग्रामपंचायत मरकागोंडी ही पैसा कायद्यांतर्गत मोडत असून "आमचे गाव, आमचा सरकार" ह्या तत्वाशी बांधिल आहे. त्यांनी स्थानिक युवकांनाच रोजगार उपलब्ध व्हावा असे विचार व्यक्त केले व त्याचप्रमाणे मत मांडले की येथील उद्योगात बाहेरील व्यक्तीचीच नेमणूक करण्यात येते. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा टेकडी विभागात आहे, प्रकल्प अधिकारी यांच्या सांगण्याप्रमाणे प्रकल्पातील झाडांना त्यांनीही पाणी दिलेले आहे. खाणकामातील ब्लास्टींमुळे (स्फोटामुळे) जर पाण्याची पातळी कमी झाल्यास, प्रकल्प प्रवर्तकांनी परिसरातील रहिवाशांसाठी पाणी उपलब्ध करुन द्यावे.

श्री बंडू राठोड यांनी असे सांगितले की सदरहू ग्रामपंचायतीचा समावेश PESA कायद्याखाली मोडत असल्याने ग्रामपंचायतीस खाणकामातील रॉयल्टीतील रक्कम मिळावी. त्यामुळे ग्रामपंचायतीस सामाजीक-आर्थिक विकासास पुरेसा निधी उपलब्ध राहिल.

श्री सय्यद सादिकसय्यद मीर, राहणार- मरकागोंडी गाव यांनी सांगितले की परिसराबाहेरील लोकांनाच या प्रकल्पात नोक-या देण्यात येतात. त्यांनी प्रकल्प चालू करण्यास काहीही हरकत नसल्याचे सांगितले

व प्रकल्प लवकारत लवकर सुरु करण्याचे आवाहन केले. मात्र स्थानिक लोकांनाच रोजगार उपलब्ध करुन द्यावेत अशी मागणी केली. त्यांनी सांगितले की स्थानिक लोकांबरोबरच त्यांनीही प्रकल्पाठिकाणी वृक्षारोपणासाठी भाग घेतलेला आहे.

श्री जालीम साब सोयाम, माथाडी गोंडगुडा, सरपंच, मरकागोंडी गाव यांनी सांगितले की प्रकल्पास त्यांची काहीही हरकत नाही. मात्र स्थानिकांना रोजगाराची संधी द्यावी.

श्री सुनंदन रेड्डी, पर्यावरणवादी, हैद्राबाद यांनी सांगितले की विशेषतः १८-३५ वयोगटातील भारतातील युवक बेकार आहेत. त्यांना रोजगार उपलब्ध न झाल्यास सामाजीक संतुलन बिघडेल. त्यामुळे विविध प्रकल्पांची आवश्यकता आहे. त्यांनी शिफारस केली की १० कि.मी. परिसरातील आरोग्य स्थितीचा आढावा घ्यावा. त्यासाठी अभ्यासगट जिल्हा प्रशासन विभागात स्थापन करण्यात यावा. तरुणांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्यात यावे. त्यांनी अशीही सूचना केली की खनन हेक्टर हेक्टरप्रमाणे करण्यात यावे. उत्खनानामुळे तयार झालेले खड्डा पावसाचे पाणी साठवण्यासाठी व हरित पट्यासाठी विकसीत करण्यात यावा.

श्री अब्दूल कादार अब्दूल सुभान, प्रकल्प प्रवर्तक यांनी बैठकीत करण्यात आलेल्या सूचनास व आक्षेपांना उत्तर दिले. ते म्हणाले की बैठकीत प्रकल्पाची जागा वन खात्याची असल्याचा आक्षेप घेण्यात आला. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी या मुद्द्यावर न्यायालयात दाद मागतली होती व माननीय न्यायालयाने प्रकल्प प्रवर्तकांची मागणी मान्य केलेली असून उत्खननास परवानगी दिलेली आहे. त्यांनीअसे सांगितले की प्रकल्पात स्थानिकांनाच रोजगाराची संधी देण्यात येते. त्याचप्रमाणे परिसरातील सामाजीक उपक्रमांना आम्ही बरीच आर्थिक मदतही केलेली आहे. यापुढेही तशी करण्यात येईल अशी ग्वाही दिली.

श्री प्रविण जोशी, सदस्य यांनी सूचना केली की प्रकल्प स्थानापासून बापुर नदी ही नऊ कि.मी. लांब आहे. प्रकल्पास भूजलाचा वापर करावा लागेल. मात्र त्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्रिय

भूजल प्राधिकरणाची (Central Ground Water Authority) परवानगी घेणेआवश्यक असून त्याबाबतची प्रक्रिया त्वरित करण्यात यावी. त्याचप्रमाणे धुळीचे प्रदूषण टाळण्यासाठी वेळोवेळी पाणी फवारणे करावे व उत्पादन प्रक्रियेमुळे तयार झालेले टाकाऊ पदार्थांचीविल्हेवाट टारपोलिन कव्हर असलेल्या ट्रक्समधूनच वाहतूक करण्यात यावी.

श्री जोशी, सदस्य यांनी असे सांगितले की चंद्रपूर शहराचा "अती प्रदूषित" शहरात समावेश करण्यात आलेला होता. ती परिस्थिती परत न येण्यासाठी आपण सर्वांनी नियम व सूचना पाळणे आवश्यक आहे.

श्री वैभव नावडकर, अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्पाची जागा वन आरक्षित मुद्द्यांबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी माननीय न्यायालयाची साक्षांकित आदेश उपलब्ध केलेले आहे. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली असून बैठकीच्या इतिवृतांमध्ये त्याचा समावेश करण्यात येईल. इतिवृतान्त मंजूर झाल्यावर महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागास सादर करण्यात येईल. सदरहू इतिवृतांत मप्रनि मंडळाच्या वेबवर प्रदर्शित करण्यात येतो. मात्र एकाद्या नागरिकास त्याची एक प्रत हवा असल्यास ती देण्यास हरकत नसावी.

मा. अध्यक्षांनी शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी व स्थानिक जनतेस बैठकीत उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार मानले व बैठक पुर्ण झाल्याचे जाहिर केले.

(वैभव नावडकर)
अध्यक्ष,
पर्यावरण विषयक जाहीर

सील

लोकसुनावणी समिती
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी,
चंद्रपूर
जिल्हा- चंद्रपूर

(प्रविण जोशी)

प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ
चंद्रपूर

सदस्य तथा

(पी. एन. धुमाळ)
समन्वयक तथा प्रभारी
उप प्रादेशिक अधिकारी,
चंद्रपूर